## सल्फर पावडर सेवन केल्याने तरुणाचा मृत्यू

**सिन्नर–** शहरातील शिक्षक कॉलनी येथील ३४ वर्षीय तरुणाने राहत्या घरात सल्फर पावडर सेवन केल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. आकाश विलास जाधव असे मृत तरुणाने नाव आहे. आकाशने आपल्या राहत्या घरात सल्फर पावडर सेवन केली. त्यामुळे त्याला उलट्या होऊ लागल्या. कुटुंबियांनी त्यास तात्काळ नाशिक येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथे उपचार सुरु असताना त्याचा मृत्यू झाला.

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

## दुचाकीवरुन घसरुन पडल्याने तरुण ठार

**वावी–** येथील भैरवनाथनगरमध्ये राहणारा २२ वर्षीय तरुण दुचाकीवरुन घसरुन पडल्याने मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. ऋषभ बैजनाथ प्रजापती असे मृत तरुणाचे नाव आहे. ऋषभ नेहमीप्रमाणे आपल्या घरून कामगारांचा जेवणाचा डबा देण्यासाठी आपल्या दुचाकीवरुन निघाला होता. शिर्डी महामार्गावर पावसाचे वातावरण असल्याने अचानक त्याची दुचाकी घसरल्याने तो दुभाजकावर जावून आदळला. यात त्याच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्याचा मृत्यू झाला. वावी पोलिसांनी घटनास्थळी येत पंचनामा केला. ऋषभ यास सिन्नर येथील एका खासगी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.






## महत्त्वाचे

### श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीची ३१ ऑगस्टला वार्षिक सर्वसाधारण सभा

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीची सन २०२२-२३ ची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील (शेतकरी निवास) सभागृहात सभापती सुधीर वेणुनाथ नवले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली असल्याची माहिती सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली. या सर्वसाधारण सभेमध्ये मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे, सन २०२३-२४ चे आर्थिक पत्रकांचे वाचन करणे व नोंद घेणे, सन २०२३-२४ चे वार्षिक अहवालाचे वाचन करणे व नोंद घेणे, सन २०२२-२३ चे लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करणे व नोंद घेणे तसेच ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे आदी विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. तरी वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### श्रावण मासानिमित्त बेलापुरात विविध कार्यक्रम

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रावण महिन्या निमित्ताने बेलापूर येथील



दावल मलिक न्यासच्यावतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महिनाभर रोज दावल मलिक दरबार येथे बाबांची महाआरती करण्यात येते. तसेच भक्तांकडून अन्नदान करण्यात येते. यासाठी सुरज महाजन, राहुल रघणे, रवि कळमकर, सुनील लबडे, पंकज शिंदे, वामन चुंबळे, प्रशांत गागरे, विलास तांबे, विजय करपे, मनोज बोटा, कारभारी कान्हे, अजय नागवडे, गोरनाथ कोते, डॉ.प्रशांत खैरनार, प्रथमेश गुगळे, अशोक साळुंखे, सुनील रसाळ, दिलीप विळस्कर, कोमल रजपूत, कैलास पवार, अशोक कांदळकर, बाजीराव वैद्य, बाळासाहेब सोनवणे, राजू सोनवणे आदी भक्तांकडून अन्नदान करण्यात येते. तरी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वयोश्री योजनेला वाकडीत चांगला प्रतिसाद



**धनगरवाडी (वार्ताहर)–** राहाता तालुक्यातील खंडोबाची वाकडी येथे ग्रामपंचायत कार्यालयात वयोश्री योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. वाकडी ग्रामपंचायत कार्यालयात सकाळपासून ६५ वर्षांवरील महिला व पुरुष यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. ग्रामपंचायततर्फे लाभार्थ्यांचे फॉर्म भरण्यात आले. याप्रसंगी सरपंच रोहिणी आहेर, श्री. आहेर, सुभाष कापसे, बापूसाहेब गोरे, राजू पठाण, डॉ. वसंतराव लबडे, सविता शेळके, अनिल शेळके, कैलास लहारे, राहुल गाढवे, विनायक देठे, सचिन आहेर, विठ्ठलराव गोरे, गंगाधर नारंगिरे, विजय सदाफळ, वाल्मिक शेळके, ग्रामविकास अधिकारी सोनवणे उपस्थित होते.

## श्रीरामपूर येथे आज हिंदू महासंमेलन व दहीहंडी

### महंत रामगिरी महाराज व व्यास महाराज यांची उपस्थिती

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** आज मंगळवार दि. २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता विश्व हिंदू परिषदेच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त गोपालकाल्याच्या मुहूर्तावर विहिंपचे हिंदू महासंमेलन, आझाद मैदान येथे आयोजित करण्यात आले आहे.

हिंदू समाजाची व भारतमातेची सुरक्षा याचा विचार करूनच साठ वर्षापूर्वी म्हणजे १९६४ सालातील कृष्ण जन्माष्टमीच्या शुभमुहूर्तावर विश्व हिंदू परिषदेची स्थापना झाली. विश्व हिंदू परिषदेच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त गोपालकाल्याच्या मुहूर्तावर विहिंपचे हिंदू महासंमेलन, गोपाल काला व दहीहंडीचा कार्यक्रम आझाद मैदान, मेनरोड येथे होणार आहे.



या हिंदू महासंमेलनामध्ये महंत रामगिरी महाराज, महेश व्यास महाराज हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जिल्हा संघचालक किशोर निर्मळ, धर्मरक्षक योगेश सूर्यवंशी, अभिजीत सरोदे आदींसह मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या हिंदू महासंमेलनास उपस्थित रहावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषद, श्रीरामपूर, बजरंग दल, दुर्गा वाहिनी, मातृशक्ती, गोरक्षण, गो संवर्धन विभाग यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## श्रीरामपूर जिल्हा आंदोलनाला वकील संघाचा पाठिंबा

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** हिंदुस्थानातील प्रभू श्रीरामांच्या नावाने पहिला असा श्रीरामपूर जिल्हा घोषित करावा व छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराजांचा पुतळा व्हावा, या मागणीसाठी श्रीरामपूर जिल्हा कृती समितीचे अध्यक्ष प्रताप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व सुरज आगे, कार्याध्यक्ष चंद्रशेखर आगे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या बेमुदत साखळी आंदोलनाला वकील संघाने पाठिंबा दिला.

आंदोलनाचा ११ वा दिवस असून काल श्रीरामपूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड.विष्णू ताके, उपाध्यक्ष ॲड.सुभाष जंगले, महिला उपाध्यक्ष ॲड.मनीषा वर्मा, सचिव ॲड.कैलास आगे, खजिनदार ॲड.अण्णासाहेब मोहन, ॲड.एस.एस.बागवान, ॲड.डी.एच.पुंड, ॲड.एस.के. चोरमल, ॲड.आर.डी.भोसले,



ॲड.एस.बी.पाठक, ॲड. रमाकांत राठोड, ॲड.बी. एच. ढोकचौळे, ॲड.एस.एन. तांबे, ॲड.निघुट, ॲड.अजित उघडे, ॲड.एस.पी.घोरपडे, ॲड.बी.बी.शिंदे, ॲड.विजय साळुंखे, सचिन नरवडे, ॲड. आकाश गायकवाड, ॲड. आशिष भोसले, ॲड.भूषण वैराळ, ॲड.अरिफ शेख, ॲड.अक्षय आगे, ॲड.प्रवीण लिप्टे, ॲड.ए.डी.मिरीकर, ॲड.ऋषिकेश बोर्डे,ॲड. प्रतीक खंडागळे, ॲड.पवन दिवटे, ॲड.मयूर भिसे यांनी पाठिंबा दिला तर शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, भाजपाचे नितीन दिनकर, भैरवनाथनगरचे सरपंच प्रवीण फरगडे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे संतोष मोकळ, बहुजन समाज पार्टीचे माजी तालुकाध्यक्ष कैलास ठोंबरे, पथविक्रेता संघटनेचे भैया भिसे, अक्षय गाडेकर, बेलापूरचे किशोर कांबळे, मातुलठाणचे विकास बोर्डे, प्रताप बोर्डे, शिरसगावचे विशाल बोंबले, महेश पवार, विजय पाचरणे, मातापूरचे बापूसाहेब उंडे, गोंधवणीचे डॉ.फरगडे, युवा सेनेचे दत्तात्रय करडे, अंबिका पतसंस्थेचे ए.के.जाधव, आर. एन.काकडे, किशोर पवार यांनी समक्ष भेटून आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

## कोपरगावात समृद्धी महामार्गावर ४ हजार किलो गोमांस पकडले

**कोपरगाव (तालुका प्रतिनिधी)–** संगमनेर येथून छत्रपती संभाजीनगरला जाणारे ४ हजार किलो गोमांस कोपरगाव पोलिसांनी गोरक्षकांच्या मदतीने पकडले. ही कारवाई कोपरगाव येथील समृद्धी महामार्गावरील टोल नाक्याजवळ करण्यात आली. टेम्पोसह नऊ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केल्याने एकच खळबळ उडाली आहे.

सोमवारी पहाटे चारच्या सुमारास गोमांसाने भरलेला ट्रक समृद्धी महामर्गावर येत असल्याची गुप्त माहिती पोलीस हेड कॉन्स्टेलबल बी. एस. कोरेकर यांना मिळाली होती. कोरेकर यांनी पोलीस उपनिरीक्षक रोहिदास ठोंबरे, पो. हे. कॉ. जाधव यांना फोन करून बोलावून घेतले. पहाटे सव्वा चार वाजता समृध्दी महामार्गाच्या कोपरगाव टोलनाक्यावर आयशर टेम्पो (एमएच १७ बीवाय ०४८९) थांबविण्यात आला. चालकाला विचारपूस केली असता त्याने उडवाडवीची उत्तरे दिली. त्यानंतर पोलीस व बजरंग दलाचे कार्यकर्ते शिवम अमृतकर, आकाश देवकर, किरण सूर्यवंशी यांनी टेम्पोची तपासणी केली तेव्हा गोवंश जातीच्या जनावरांचे मांस भरलेले दिसून आले. त्यानंतर चालक जाकिरखान नसिरखान पठाण (वय ४९, रा. देविगल्ली, मोगलपुरा संगमनेर) व फारुक कासम शेख (वय ५९, रा. सेवकनगर, के.ए. रोड, जरी मारी कुर्ला वेस्ट, मुंबई, हल्ली राहणार जमजम कॉलनी संगमनेर) यांना ताब्यात घेण्यात आले. चार लाख रुपयांचे चार हजार किलो गोमांस व पाच लाख रुपये किमतीचा टेम्पो असा एकूण ९ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. दहे यांनी मांसाचे नमुने तपासणी करिता राखून ठेवले. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल बाळू भाऊराव घोंगडे यांच्या फिर्यादीवरून वरील दोघांविरूद्ध महाराष्ट्र गो संरक्षण अधिनियमाचे कलम ५ (क), ९, ११ व भा. न्या. सं. २२३, २८१, २७३, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### महाविद्यालयीन तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेदरम्यान

## श्रीरामपुरात पंच प्राध्यापकास मारहाण

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** शहरातील दोन महाविद्यालयांमध्ये खो-खो मॅच सुरू असताना, जुन्या वादातून एका महाविद्यालयाच्या संघाने स्पर्धेसाठी पंच म्हणून काम पहात असलेल्या प्राध्यापकास लाठी काठीने बेदम मारहाण केली. सदर घटना शनिवारी घडली. या प्रकरणाची पोलीस ठाण्यात नोंद देखील नाही.

शहरात एका नामांकित शैक्षणिक संकुलामध्ये शनिवारी महाविद्यालय अंतर्गत तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा सुरू होत्या. खो-खो मॅच सुरू असताना एका नामांकित महाविद्यालयाचा संघ पराभवाच्या छायेखाली असताना त्यातील काही तरुणांनी स्पर्धेसाठी पंच म्हणून काम पाहत असलेल्या दुसऱ्या महाविद्यालयाच्या प्राध्यापकास बेदम मारहाण करण्यास प्रारंभ केला. तो वाद महाविद्यालयाच्या वरिष्ठांनी मध्यस्थी करून मिटविला. यामध्ये जखमी झालेल्या 'त्या' प्राध्यापकास येथील साखर कामगार हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

हा प्रकार जुन्या वादातून झाला असल्याची माहिती त्या प्राध्यापकाच्या नातेवाईकांनी दिली. खरेतर एवढी गंभीर घटना महाविद्यालयाच्या आवारात घडूनही त्या महाविद्यालयाच्या वरिष्ठांनी यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. यातील दोषींना शासन व्हायला पाहीजे, अशी भूमिका जखमी प्राध्यापकाच्या काही नातेवाईकांनी घेतली आहे. परंतु घटना घडून दोन दिवस उलटले तरीही कोणत्याही प्रकारची नोंद पोलीस ठाण्यात झालेली नाही.

शिक्षणाची पंढरी समजल्या जाणाऱ्या या शिक्षण संकुलात अशा घटना घडायला नको, त्यासाठी वरिष्ठांनी लक्ष घालायला पाहिजे, अशी मागणी होत आहे.

### सिनेअभिनेत्री श्रुती मराठे यांच्या उपस्थितीत

## श्रीरामपुरात उद्या मानाची दहीहंडी

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** सालाबादप्रमाणे श्रीरामपूर शहरातील मानाच्या दहीहंडीचे आयोजन उद्या बुधवार दि. २८ ऑगस्ट रोजी सिनेअभिनेत्री श्रुती मराठे यांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे. यासाठी पढेगाव येथील उद्योजक जितेंद्र तोरणे यांच्यावतीने १ लाख ११ हजार १११ रुपयांचे बक्षिस ठेवण्यात आले आहे.



शहरात दरवर्षी ही मानाची दहीहंडी उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येतो. यंदाचे हे ११ वे वर्ष आहे. श्रीराम मंदीर चौकात दहीहंडी (गोपालकाला) उत्सव साजरा केला जातो. अध्यक्ष गणेश भिसे, विशाल अंभोरे, मनोज भिसे, अभिजित लिप्टे, दत्तात्रय खेमनर, अजय छल्लारे, राहूल पांढरे, अक्षय गाडेकर, सिद्धार्थ सोनवणे, महेश उदावंत, अभिषेक माळवे, कमलेश भालदंड, अक्षय वर्पे आदी या उत्सवासाठी प्रयत्नशील आहेत. तरी या उत्सवासाठी राम मंदिर चौक येथे बुधवारी सायंकाळी ६ वाजता उपस्थित रहावे, असे आवाहन दहीहंडी उत्सव समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

## दहेगावकरांची आदर्श गाव बनविण्यासाठी धडपड

### आदर्श गावासाठी ग्रामस्थ एकवटले! सरपंच पेरे यांची घेतली भेट

**महेंद्र जेजुरकर**

**राहाता–** सेवानिवृत्त पोलीस निरीक्षकाने आपल्या गावाला आदर्श गाव बनविण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांना गावातील तरुणांची साथ मिळाली, गावात मनात भरेल असे कामही सुरू केले, भास्करराव पेरे यांचेही घेतले मार्गदर्शन!

राहाता तालुक्यातील दहेगाव (देवी) डांगेज पॅटर्नचे प्रणेते प्राचार्य इंद्रभान डांगे यांचे गाव. त्यांचे लहान बंधू वरिष्ठ पोलीस निरीक्षक मेघश्याम डांगे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. आपले गाव दहेगाव का चांगले करू नये! ही कल्पना त्यांना सुचली. त्यांनी गावातील तरुण एकत्र केले. बैठक घेतली, माझ्याबरोबर काम करा, राजकारणाचे जोडे बाहेर काढून निःस्वार्थी पणे काम करा, अशी अपेक्षा व्यक्त केली. या ८-१० तरुणांनी तात्काळ होकार देत गावात स्वच्छता अभियान सुरू केले. सुरुवातीला गावातील सर्व मंदिरे पाण्याने स्वच्छ केली. स्मशानभूमी स्वच्छ केली.

गावात येणाऱ्या-जाणाऱ्या रस्त्यांच्याकडेला झाडे लावण्याचा उपक्रम हाती घेतला. सकाळी ६ वाजता उठायचे, टिकाव पावडे, घमेले घेऊन रस्त्याच्या कडेला खड्डे घ्यायचे आणि त्यामध्ये वृक्षारोपण करायचे! हा उपक्रम हाती घेतला. लावलेल्या झाडांना जाळीचे कुंपन करायचे. लावलेल्या झाडांना पाणी देण्यासाठी प्राचार्य इंद्रभान डांगे यांच्या स्मरणार्थ एक टँकर खरेदी केला. पाणीही झाडांना दिले जात आहे. मंदिरे आणि स्माशनभूमी भोवती फुलझाडेही लावली आहेत. अर्थात या तरुणांनी एकत्र येऊन वर्गणी करून हा उपक्रम हाती घेतला आहे. गावात ज्येष्ठ नागरिकांना विश्रांतीसाठी बसण्यासाठी २५ बाकडे ग्रामस्थांकडून मिळविली व ती गावात जागोजागी ठेवली. यासाठी देणगीदारांना प्रवृत्त केले.

गावातील अवैध व्यवसाय बंद व्हावेत म्हणून असे कुणी



> या शिष्टमंडळाने नेवासे तालुक्यातील देवगड येथे जाऊन गुरुवर्य भास्करागिरी महाराजांची भेट घेत आशिर्वाद घेतले. देवगडला भास्करगिरी महाराज यांनी स्वर्ग बनविला, आपण आदर्श गाव का बनवू नये! असे विचार तरुणाई पुढे मांडले. दिवंगत प्राचार्य इंद्रभान डांगे यांचे संस्कार आम्हाला मिळाले. त्यामुळे गाव आदर्श करण्यासाठी आम्ही एकजूट दाखवू. **–भगवान डांगे**, दहेगाव

करत असेल तर त्यांना सर्वांनी बोलावून घेवून त्यांना गोडीत समजावून सांगत ते धंदे बंद करण्यास सांगितले. त्या अवैध व्यावसायिकांनीही त्यांना बंद करण्यासाठी साथ दिली. गावात बाहेरगावहून येऊन भाईगिरी करत असेल तर ते रोखण्यासाठीही गाव एक झाले. महिला व शाळकरी मुलींची छेड काढणारांनाही त्यांनी बोलावून समज दिली. व त्यांना परावृत्त केले. या उपक्रमातील तरुणांनीही व्यसन मुक्त राहण्याची शपथ घेतली.

गाव आदर्श व्हावे, विविध तज्ञांचे मार्गदर्शन होण्यासाठी, अथवा जे गाव आदर्श झालेत, त्यांची पाहणी करण्यासाठी दर महिन्याला ग्रामस्थांचा अभ्यास दौरा काढण्यात येणार आहे. यासाठी प्रीतिसुधाजी शैक्षणिक संकुलाची बस देण्यात येणार आहे. याचाच भाग म्हणून दोन दिवसांपूर्वी तरुणाईसह मेघ: श्याम डांगे, भगवान डांगे यांनी संभाजीनगर जिल्ह्यातील पाटोदा येथील सरपंच भास्करराव पेरे पाटील यांची भेट घेतली. दीड तास त्यांनी या शिष्टमंडळाशी चर्चा केली. काही सल्लेही त्यांनी या दहेगावकरांना दिले. ग्रामपंचायतीच्या पट्ट्या भरल्या का? गावात काम करताना राजकिय लोकांपासून दूर रहा, एका विचाराने काम करा, संघटीत होऊन काम करा, गाव सुधारायला वेळ लागणार नाही. खेडेगाव ही भारताची अस्मिता आहे. तीची जोपासना करणे प्रत्येक खेड्यातील ग्रामस्थांचे कर्तव्य आहे, काम चालू द्या, यश मिळेल! यावेळी चर्चेत माजी सरपंच भगवानराव डांगे, तसेच सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक मेघश्याम डांगे, महेश डांगे, जयराम डांगे, गणेश डांगे, विजय डांगे यांनी विविध प्रश्न विचारत माहिती घेतली.

या दौऱ्यात भगवान डांगे, मेघश्याम डांगे, ज्ञानेश्वर गुंजाळ, महेश डांगे, गणेश डांगे, मयूर साबळे, संदीप डांगे, संजय डांगे, किशोर डांगे, किरण डांगे, आदेश डांगे, किशोर डांगे, अण्णा डांगे, कैलास डांगे, मिलिंद डांगे, विजय डांगे, वसंत डांगे, अशोक शिंदे, सतीश गुंजाळ, प्रकाश डांगे, मारुती मेजर, जयराम डांगे, उत्तम डांगे, शिवाजी डांगे, संजय गुंजाळ, राजेंद्र डांगे, ऋषिकेश डांगे, राधेश डांगे, भालेराव आदी सहभागी झाले होते.

सार्वमत

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक– ✻ अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)